स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधर गटामधून निवडून द्यावयाच्या दहा सदस्यांसाठी येत्या रविवार दि. २९ जानेवारी, २०२३ रोजी २२ हजार ६६३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.**

रविवारी जळगाव, धुळे व नंदुरबार या तिनही जिल्ह्यातील २७ मतदान केंद्रावरील ६० बुथवर सकाळी ८ ते सायंकाळी ५ या कालावधीत मतदान होणार आहे. एकूण २२ हजार ६६३ मतदारांची नोंदणी झालेली आहे अशी माहिती कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

**मतदान केंद्र पुढीलप्रमाणे आहेत –**

**जळगाव जिल्हा**

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (दृकश्राव्य कक्ष प्रशासकीय इमारत १ बुथ)
२. मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (विवेकानंद भवन तळमजला वर्ग क्र. १, २, ३, ५, ८, १०, ११,१२ असे एकूण ८ बुथ)
३. पी.ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ (तळमजला डी विंग कक्ष क्र. ५३, लेडीज रूम आणि एफ बिल्डींग स्टाफ रूम असे३ बुथ)
४. कला, वाणिज्य व मनोहरशेठ धारिवाल विज्ञान महाविद्यालय, जामनेर (तळमजल्यावरील कक्ष क्र. एलएच ३, ५, ८, १४,१५ असे एकूण ५ बुथ)
५. श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर(तळमजला सेमीनार हॉल असा १ बुथ)
६. बोदवड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड (तळमजला कक्ष क्र. १५ असा १ बुथ)
७. धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (तळमजला रूम नं. १०२ असा १ बुथ)
८. ज.जि.म.वि.प्र.चे कला, वाणिज्य व विज्ञान महा., यावल (तळमजला रूम नं.१३ असा १ बुथ)
९. रावेर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे महाविद्यालय, रावेर(तळमजला सेमिनार हॉल १ बुथ)
१०. प्रताप महाविद्यालय, अमळनेर(कनिष्ठ महाविद्यालय नवीन इमारत तळमजला रूम नं. ७ व ९ असे २ बुथ)
११. डी. एस. पाटील महाविद्यालय, एरंडोल (तळमजला १ बुथ)
१२. प.रा. हायस्कूल सोसा.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव (तळमजला १ बुथ)
१३. कि.वि.प्र.संस्थेचे किसान कला, वाणिज्य व विज्ञान महा.,पारोळा (तळमजला अध्यापक कक्ष १ बुथ)
१४. एम. एम. महाविद्यालय, पाचोरा (मुख्य इमारत तळमजला १ बुथ)
१५. सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महा., भडगाव (तळमजला रूम नं. व ७ असे २ बुथ)
१६. बी.पी. कला, एस.एम.ए. विज्ञान व के.के.सी. वाणिज्य महा., चाळीसगाव (तळमजला कक्ष क्र. ४ व ८ असे २ बुथ)
१७. महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महा., चोपडा (तळमजला सह्याद्री इमारत १ बुथ)

**धुळे जिल्हा**

१८. झेड बी. महाविद्यालय, धुळे (तळमजला कक्ष क्र. ६ (अ), लेडीज रूम, विद्यार्थी वाचन कक्ष, रंगमंच कक्ष आणि जुने उपहारगृह असे एकूण ५ बुथ)
१९. व्ही. व्ही. एम संस्थेचे महाविद्यालय, साक्री (तळमजला कक्ष क्र. ८ व ९ असे २ बुथ)
२०. एस. पी. डी. एम. महाविद्यालय, शिरपूर(तळमजला कक्ष क्र. १०७, १०८, १०९,११०,१११, ११४ आणि स्टाफ रूम असे एकूण ७ बुथ)
२१. एस. एस. व्ही. पी. एस. संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, शिंदखेडा(तळमजला कक्ष क्र. ११४, ११६, ११७ असे एकूण ३ बुथ)
२२. श्रीमती पी.बी. बागल कला व वाणिज्य महाविद्यालय, दोंडाईचा (तळमजला अर्थशास्त्र विभाग आणि इंग्रजी विभाग असे २ बुथ)

**नंदुरबार जिल्हा**

२३. जी. टी. पी. महाविद्यालय, नंदुरबार (मुख्य इमारत तळमजला वर्ग क्र. २,४,६ आणि ८ असे ४ बुथ)
२४. श्री.सु.व्हि.नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर (मुख्य इमारत तळमजला १ बुथ)
२५. पुज्य साने गुरूजी विद्याप्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा (पहिला मजला मध्यवर्ती ग्रंथालय १ बुथ)
२६. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तळोदा (तळमजला १ बुथ)
२७. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अक्कलकुवा (तळमजला १ बुथ)

# बातमी नं. २

**जळगाव दि.२४ (प्रतिनीधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाच्या वतीने पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रमास प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन संमंत्रण सत्राचा समारोप कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली झाला.**

समाजाचा कोणताही व्यक्ती उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये तसेच काही कारणास्तव अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी बहि:स्थ पध्दतीने प्रवेश या विभागात दिले जातात. एम.ए. (विविध विषय) आणि एम.कॉम. अशा पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण क्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे समंत्रण सत्र घेतले जाते. या सत्राद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात ऑनलाईन संवाद होतो. विषय निहाय संमंत्रक प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असतात. या सत्राचा समारोप ऑनलाईन पध्दतीने कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या विभागामार्फत किमान तीस तासांचे मूल्याधिष्टीत आणि कौशल्यावर अधारीत जवळपास २० प्रमाणपत्र शिक्षणक्रम ऑनलाईन पध्दतीने येत्या काही महिन्यात सुरू केले जाणार असून. नोकरी अथवा व्यवसाय करणाऱ्या विद्यार्थ्यांची विविध कौशल्य वृध्दींगत होण्यासाठी या नवीन शिक्षणक्रमाचा फायदा होणार असल्याचे कुलगुरूंनी यावेळी सांगितले. समारोप प्रसंगी डॉ. प्रशांत देशमुख, डॉ. शशी गायकवाड तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून डॉ. प्रियंका जावळे, जयप्रकाश बाविस्कर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मनिषा जगताप यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रभारी संचालक डॉ. मनिषा इंदाणी यांनी आभार मानले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २४ जानेवारी, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी